दिनांक: १० ऑगस्ट २००७

## मुक्तिकृत वित्तप्रेषण योजनेखाली वारंवार विचारण्यात येणारे प्रश्न.

## रिझर्व बँकेचा प्रतिसाद

निवासी व्यक्तिंना उपलब्ध असलेल्या विदेशी चलनाच्या सुविधांच्या अधिक सुलभीकरणासाठी आणि मुक्तिकरणासाठी एक पाऊल म्हणून भारतीय रिझर्व बँकेने फेब्रुवारी २००४ मध्ये मुक्तिकृत वित्तप्रेषण योजना जाहीर केली होती. या योजनेनुसार, कोणत्याहि अनुज्ञेय भांडवली किंवा चालू खाते व्यवहारासाठी निवासी व्यक्तिला प्रति आर्थिक वर्षी यूएस डॉलर १००,००० पर्यंत वित्तप्रेषण करता येईल. योजना दिनांक फेब्रुवारी ४, २००४ ए.पी. (डीआयआर मालिका) परिपत्रक क्र. ६४ अन्वये प्रचालनीय झाली. अधिकृत डिलर बँका आणि फॉरिन एक्स्चेंज डिलर्स असोशिएशन ऑफ इंडिया यांच्याकडून भारतीय रिझर्व बँकेला काही प्रतिप्रश्न प्राप्त झाले आहेत आणि विचारविनिमयाच्या आधारावर, योजनेच्या विविध प्रचालनीय विषयांवर स्पष्टीकरणे खाली देण्यात आली आहेत:

**प्रश्न १:** योजनेखाली अनुज्ञेय असलेल्या भांडवली खाते व्यवहारांची सूची पुरविण्यात यावी.

योजनेखाली निवासी व्यक्तिला कोणत्याहि अनुज्ञेय चालू किंवा भांडवली खात्यातील व्यवहारासाठी किंवा दोहोंसाठी संयुक्तपणे वित्तप्रेषणाला परवानगी आहे. या योजनेखाली, निवासी व्यक्ति रिझर्व बँकेच्या पूर्वानुमतिविना भारताबाहेर कोणतीहि स्थावर मालमत्ता किंवा समभाग किंवा ऋण साधने किंवा कोणतीहि अन्य मत्ता संपादन करू शकते किंवा धारण करू शकते. अशा व्यक्ति भारताबाहेरील बँकात खातेहि उघडू, चालवू किंना धरण करू शकतात. परंतु, हे स्पष्ट करण्यात आले होते कि, समुद्रपार विनिमय केंद्रे-समुद्रपार प्रतिपक्ष याना मार्जिन किंवा मार्जिन कॉल्ससाठी भारतातून वित्तप्रेषणाला परवानगी नाही.
योजनेखाली वित्तप्रेषणाला खालील बाबतीहि अनुज्ञा नाहीः
१) विदेशी विनिमय व्यवस्थापन (चालू खाते व्यवहार) नियम, २००० च्या परिशिष्ट-१ अधीन विनिर्दिष्टीतपणे मनाई केलेल्या कोणत्याहि हेतूसाठी (लॉटरी-स्वीप स्टेक तिकीटांच्या, बंदी असलेल्या मासिकांच्या खरेदीसाठी वगैरे) किंवा परिशिष्ट-२ अधीन निर्बंध असलेल्या बाबींसाठी वित्तप्रेषण.
२) भूतान, नेपाळ, मॉरिशिअस किंवा पाकिस्तानला प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष केलेले वित्तप्रेषण.
३) फाइनॅन्शियल ॲक्शन टास्क फोर्स (एफएटीएफ) ने वेळोवेळी "असहकारी देश आणि प्रदेश" म्हणून जाहीर केलेल्या देशांना प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष केलेले वित्तप्रेषण.
४) रिझर्व बँकेने बँकांना स्वतंत्रपणे कळविल्याप्रमाणे दहशतवादी कृत्ये करण्याची खूप शक्यता असणा-या व्यक्ति किंवा एककाना प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे केलेले वित्तप्रेषण.

**प्रश्न २:** ही सुविधा वित्तप्रेषणाखालील परिशिष्ट-२ मध्ये तपशीलवार दिलेल्या विद्यमान सुविधांच्या व्यतिरिक्त आहे काय ?

योजनेखालील सुविधा विदेशी विनिमय व्यवस्थापन (चालू खाते व्यवहार) नियम, २००० च्या परिशिष्ट ३ मध्ये वर्णिलेल्या खाजगी प्रवास, व्यावसायिक प्रवास, अभ्यास, वैद्यकीय उपचार,

वगैरेंसाठी आधीच उपलब्ध असलेल्या सुविधांव्यतिरिक्त आहे. ही योजना या कारणांसाठीहि वापरता येईल. परंतु, दान आणि देणग्यांचे वित्तप्रेषण वेगवेगळे करता येणार नाही आणि ते केवळ योजनेखालीच करावे लागेल. त्यानुसार, निवासी व्यक्ति या योजनेखाली प्रत्येक आर्थिक वर्षात यूएस डॉलर १००,००० पर्यंत दान आणि देणग्या वित्तप्रेषित करू शकतील.

**प्रश्न ३:** निवासी व्यक्तिनी विदेशातील ठेवी-गुंतवणूकीवर, मुद्दली रकमेच्या वरील, उपार्जित नफा या योजनेखाली भारतात प्रत्यावर्तित करणे आवश्यक आहे का ?
या योजनेखाली केल्ल्या गुंतवणूकीवर प्राप्त केलेले उत्पन्न गुंतवणूकदार ठेवू शाकतो किंवा त्याची पुनर्गुंतवणूक सरू शकतो. या योजनेखाली केलेल्या गुंतवणूकीवर प्राप्त केलेले उत्पन्न किंवा निधी निवासीनी आताच प्रत्यावर्तित करणे आवश्यक नाही.

**प्रश्न ४:** योजनेखालील वित्तप्रेषण ढोबळ तत्त्वावर असेल कि नक्त तत्त्वावर (विदेशातून प्रत्यावर्तनाच्या नक्त) ?

या योजनेखालील वित्तप्रेषण ढोबळ तत्त्वावर असेल.

**प्रश्न ५:** अल्पवयीनसुध्दा वित्तप्रेषणाच्या सुविधेचा फायदा घेऊ शकतात कां ?

ही सुविधा अल्पवयस्कांसहित सर्व निवासी व्यक्तिना उपलब्ध आहे.

**प्रश्न ६:** या सुविधेखालील वित्तप्रेषण कुटुंबाच्या सदस्यांच्या बाबतीत एकत्रित करता येईल कां ?

कुटुंबाच्या प्रत्येक सदस्याने योजनेच्या अटी आणि शर्तींची पूर्तता करण्याच्या अधीन या योजनेखालील कुटुंबाच्या सदस्यांच्या बाबतीतील वित्तप्रेषण एकत्रित करता येईल.

**प्रश्न ७:** थेट किंवा लिलाव केंद्राच्या माध्यमातून कलावस्तू (पेंटिंग वगैरे) विकत घेण्यासाठी या योजनेचा उपयोग करता येईल कां ?

भारत सरकारच्या, अस्तित्वातील विदेश व्यापार धोरण अशासारख्या लागू असलेल्या अन्य कायद्यांच्या तरतूदींच्या अधीन या योजनेखालील वित्तप्रेषणाचा उपयोग कलावस्तूंच्या खरेदीसाठी करता येईल.

**प्रश्न ८:** यूएस डॉलर ५०००- (दान, देणगी वगैरे) च्या छोट्या रकमेचे वित्तप्रेषण यूएस डॉलर १०,०००- च्या एलआरएस व्यतिरिक्त आहे कां ?

दान आणि देणग्या यांच्या समक्ष वित्तप्रेषण वेगळे करता येणार नाही आणि ते केवळ योजनेखालीच करावे लागेल आणि त्यामुळे दान आणि देणग्यांसाठी वेगळी मर्यादा उपलब्ध नाही.

**प्रश्न ९:** एडीने व्यवहाराच्या स्वरूपाच्या आधारावर वित्तप्रेषणाची अनुज्ञेयता तपासणे आवश्यक आहे कि तो त्याला वित्तप्रेषकाच्या घोषणेच्या आधारावर परवानगी देऊ शकतो ?

वित्तप्रेषकाने व्यवहाराच्या स्वरूपाच्या केलेल्या घोषणेद्वारा एडीला मार्गदर्शन मिळेल आणि वित्तप्रेषण रिझर्व बँकेने निर्गमित केलेल्या सूचनांनुसार असल्याचे तो प्रमाणित करील.

**प्रश्न १०:** या योजनेखाली इएसपीओच्या संपादनासाठी ग्राहक निधी वित्तप्रेषित करू शकतो का ?

ही योजना इएसपीओच्या संपादनासाठी निधीचे वित्तप्रेषण करण्यासाठी सुद्धा वापरता येईल.

**प्रश्न ११:** ही योजना एडीआर-जीडीआरशी संलग्न इएसपीओ (म्हणजेच ५ दिनदर्शिका वर्षांच्या एका गटासाठी यूएस डॉलर ५०,०००/-)च्या संपादनाव्यतिरिक्त आहे का ?

योजनेखालील वित्तप्रेषण एडीआर-जीडीआरशी संलग्न इएसपीओ च्या संपादनाव्यतिरिक्त आहे.

**प्रश्न १२:** ही योजना अर्हता समभागांच्या संपादनाव्यतिरिक्त(म्हणजेच समुद्रपार कंपनीच्या पूर्ण भरणा केलेल्या भांडवलाच्या १ % म्हणून यूएस डॉलर २००००/-) आहे कां ?

योजनेखालील वित्तप्रेषण अर्हता समभागांच्या संपादनाव्यतिरिक्त आहे.

**प्रश्न १३:** या योजनेखाली निवासी व्यक्ति म्युच्युअल फंड, व्हेंचर फंड, अनरेटेड डेब्ट सिक्यूरीटीज्, प्रॉमिसरी नोटस् वगैरेत गुंतवणूक करू शकते कां ?

या योजनेखाली निवासी व्यक्ति म्युच्युअल फंड, व्हेंचर फंड, अनरेटेड डेब्ट सिक्यूरीटीज्, प्रॉमिसरी नोटस् वगैरेत गुंतवणूक करू शकते. त्याशिवाय, या योजनेखाली विदेशात उघडलेल्या बँक खात्यातून निवासी अशा प्रतिभूतींमध्ये गुंतवणूक करू शकते.

**प्रश्न १४:** एकाद्या व्यक्तिने अनिवासी असताना विदेशात उभारलेल्या ऋणाची ती भारतात परत आल्यावर, या योजनेखाली निवासी म्हणून परतफेड करू शकते कां ?

हे अनुज्ञेय आहे.

**प्रश्न १५:** या योजनेखाली बाहेर वित्तप्रेषणासाठी निवासी व्यक्तिला पॅन क्रमांक असणे बंधनकारक आहे कां ?

या योजनेखाली वित्तप्रेषणासाठी पॅन क्रमांक असणे बंधनकारक आहे.

**प्रश्न १६:** निवासी व्यक्तिने तिच्या खाजगी भेटीच्या वेळी धनकर्षाच्या निर्गमनाद्वारे(तिच्या स्वतःच्या नावाने किंवा ज्या लाभार्थीच्या द्वारे ती अनुज्ञेय व्यवहार पूर्ण करू इच्छिते तिच्या नावे) बाहेर वित्तप्रेषणासाठी विनंती केली असता, वित्तप्रेषकाच्या स्वयंघोषणेच्या आधारे असे बाहेरील वित्तप्रेषण प्रभावी करता येईल कां ?

असे धनकर्षाच्या स्वरुपातील बाहेरील वित्तप्रेषण या योजनेखाली विहीत नमुन्यातील निवासी व्यक्तिच्या घोषणेद्वारे प्रभावी करता येईल.

**अल्पना किल्लावाला**
मुख्य महाव्यवस्थापक

**प्रसिद्धी पत्रक ः २००७-२००८/२२९ .**